Vol II Issue VII Jan 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 7, Jan. 2013
ISSN:-2231-5063 Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# खानदेशातील अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश एक अभ्यास

***रावसाहेब भिमराव नेरकर***

इतिहास विभाग प्रमुख
राणी लक्ष्मीबाई महाविदयालय,पारोळा जि. जळगांव

***सारांश***

19 व्या शतकात आणि 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय समाज व्यवस्थेत जातीयतेने ताठर रूप धारण केलेले होते. कर्म आणि गुणांवर आधारित असलेली वर्णव्यवस्था हळूहळू जन्माधिष्ठीत झालेली दिसून येते. प्रस्तुत काळात समाजावर सनातनी विचारसरणीच्या मंडळीचे वर्चस्व होते. आपल्या पारंपारिक रूढी आणि परंपराचे पालन करणे आणि त्यांचे संवर्धन करणे यालाच त्यांनी आपले धर्मकृत्य मानलेले होते. तर याउलट या पारंपारिक दुष्ट रूढी परंपरातून समाजाची सुटका करण्यासाठी बुध्दीनिष्ठ परिवर्तनवादी विचारसरणीच्या मंडळीनी 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरूवात केलेली होती.

***प्रस्तावना :***

सनातनी विचारसरणीची मंडळी अस्पृश्यतेला जन्मसिध्द मानीत होती तर परिवर्तनवादी मंडळी अस्पृश्यता म्हणजे पारंपरिक दुष्ट रूढी परंपरेचाच एक भाग समजत असत. 'अस्पृश्यतेला धर्मशास्त्रात नव्हे तर वेदातांत देखील कोठेही आधार नाही. शास्त्रात अस्पृश्यता ही नैमत्तीक म्हणजे धंदयामुळे किंवा अशाच काही कारणामुळे सांगितलेली असते. आजच्या स्वरूपातील म्हणजे जन्मामुळे मानली जाणारी अस्पृश्यता ही शास्त्र मूलक नसून रूढीमूलक आहे.'[1] म्हणूनच या वाईट प्रथेला आपण मोडून काठले पाहिजे अशी एक मनोभूमिका सुधारणावाद्यांनी मांडायला सुरूवात केलेली होती.

खानदेशातील सामाजिक विषमतेचे स्वरूप दीन – दलित वर्गाला सवर्ण जातीपासून दूर ठेवणारे होते. सनातनी वर्गाने समाजात अशा एक समज निर्माण केलेला होता की हिंदू धर्मशास्त्रात स्पृश्य – अस्पृश्यतेला स्थान असून धर्मशास्त्रीय दृष्टया हया गोष्टीला आधार आहे. प्रस्तुत गैरसमज दूर करून अस्पृश्यता मानणे हे पाप आहे आणि धर्मशास्त्रीय दृष्टया चुकीचे आहे अशी विचारप्रणाली असलेला एक प्रभावी गट विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पुढे आला. आज आपण ज्यांना अस्पृश्य मानतो त्यांना अस्पृश्य मानण्यास शास्त्रात एकही प्रमाण नाही ही अस्पृश्यता केवळ रूढीजन्य असून ती धर्मशास्त्राच्या विरूध्द आहे ती नाहीशी करणे हे प्रत्येक धर्मभिम्यानाचे काम आहे.'[2] असा विचार प्रवाह पुढे आलेला दिसतो. ज्या गोष्टींना धर्मशास्त्रातच स्थान नाही त्या फक्त रूढी परंपरेने समाजाला चिकटून ठेवणे हे सर्वतः चुकीचे असल्याचे बुध्दीवाद्यांना वाटू लागले. 'चातुवर्ण्यातील पहिले तीन वर्ण हे शुद्रांशी अन्नपाण्याचाच नव्हे तर विवाह संबंधाचाही व्यवहार करीत असत प्रत्यक्ष विवाहाच्या संबंध ठेवू शकत असे तेथे अस्पृश्यता म्हणजे जन्मजात अस्पृश्यतेची कल्पना देखील असणे शक्य नाही.'[3] अशी स्पष्टोक्ती बुध्दीवादयांनी केलेली दिसते. समाजव्यवस्थेतील सनातनी वर्ग अस्पृश्यतेला जन्मसिध्द मानीत असे. जातीव्यवस्थेला शास्त्रीय आधार नसतांनाही सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास तसेच मंदीर प्रवेशास सवर्ण वर्ग विरोध करीत असल्याचे दिसून येते. 'खानदेशातील अस्पृश्य बांधवांना मंदीरातून पूजाअर्चा करण्यास, मनाई होती.'[4] म्हणजेच रूढीवादी समाज व्यवस्थेत अस्पृश्यांना मंदिर प्रवेश निशिध्द करण्यात आलेला होता. म्हणूनच खानदेशातील परिवर्तनवादी गटाच्या साने गुरूजी, बाळूभाई मेहता, धनाजी नाना चौधरी, आपश्री गुला महाराज आदिनी धर्मशास्त्रीय दृष्टया अस्पृश्यांचा मंदीर प्रवेश योग्य असल्याचा निर्वाळा दिला.

सनातनी वर्गाने ज्या अंत्यजांना अस्पृश्य मानलेले होते. त्या अत्यंजानाही धर्मशास्त्रीयदृष्टया नामस्मरण करण्याचा, एकादशी, शिवरात्री इत्यादी व्रतवैकल्य करण्याचा, पंचाक्षरी मंत्र जपण्याचा, भागवत सप्ताह करण्याचा अधिकार दिलेला आहे परंतु सनातनी मंडळीनी तो अधिकार अस्पृश्याकडून हिरावून घेतलेला होता.

अंत्रीसंहिता, आणि बृहस्पती यातील श्लोकानुसार देवयात्रा, लग्नसमारंभ यज्ञ प्रकरण, उत्सव, तीर्थे, लढाई, राष्ट्रीय संकट व कष्टदायक एखादी आपत्ती यांच्यावेळी स्पर्शास्पर्श नसतो ही गोष्ट स्पष्ट होते. या आधारावर अस्पृश्यांना मंदीरप्रवेश करू दिला पाहिजे अशी भूमिका बुध्दिवादयांनी याकाळात मांडली. जो अधिकार शास्त्राने दिलेला आहे तो हिरावून घेणे धर्मशास्त्रीय दृष्टया चुकीचे असल्याचे मत याकाळात पुढे आलेले होते. 'वेद काळी मूर्ती आणि मंदिराची कल्पनाच नसल्यामुळे मंदिर प्रवेशासंबंधी अनुकूल अगर प्रतिकूल काहीच सांगितलेले नाही. तसेच श्रृती, स्मृती मध्येही मंदीर प्रवशासंबंधी कुठलीही मते सांगितलेली नाहीत त्यामुळे सनातन वैदिक धर्माच्या नावाने मंदीर प्रवेश नाकारणे चुकीचे आहे.'[5] असा विचार सुधारणावाद्यांनी मांडलेला होता. युध्द, यज्ञ, उत्सव, देवळे, यात्रा आणि आपत्तीच्या ठिकाणी स्मृतीकार स्पर्शदोष सांगत नाही यावरून अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशास स्मृतींचा प्रतिबंध नाही हे निःसंदेह सिध्द होते.

अखिल भारतीय पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच काळात मंदिर प्रवेशाची चळवळ हाती घेतलेली होती. महात्मा गांधीनी 1933 मध्ये येरवडा याठिकाणी कारावासात असतांना अस्पृश्यतेच्या संदर्भात शास्त्री पंडीताशी चर्चा करून जे पत्रक काढले होते त्या पत्रकात, ' अछूतों का हिंदू मंदीरोमे प्रवेश हो सकता है, कोई पाप नही लग सकता।'6 असे स्पष्ट करून अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशाचे समर्थन केलेले होते.

**Title:** *खानदेशातील अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश एक अभ्यास*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *रावसाहेब भिमराव नेरकर* **yr:2013 vol:2 iss:7**

अश्याप्रकारे संपूर्ण देशभरात अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशाची चळवळ छेडली गेलेली होती. अस्पृश्यांचा मंदीर प्रवेश हा फक्त हिंदूच्या मंदीरात प्रवेश घेण्यापूरता मर्यादीत नव्हता तर हिंदूची सामाजिक मक्तेदारी मोडून काढण्यासाठी ही चळवळ उभी राहलेली होती याबाबतीत खानदेशही मागे नव्हता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीनी म्हटले आहे की, मेरा कहना है, मंदीर सब भक्तो के लिये खुला है। हिंदू धर्मशास्त्र किसी को मंदीर मे जानेसे रोकता नही।'[7]

सनातनी मंडळी धर्माच्या नावाखाली अस्पृश्यांचा मंदीर प्रवेश नाकारीत होती. ही बाब तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सारख्या बुध्दीवादी मंडळीनी सप्रमाण खोडून काढले उलट अस्पृश्याच्या मंदीर प्रवेशास धर्मशास्त्रीय आधार असल्याचे स्पष्ट केले त्यामुळे खानदेशात अस्पृश्यता निर्मुलन चळवळी बरोबर मंदीर प्रवेशाची चळवळ विशेष जोर धरू लागलेली होती. 'धुळे शहरात हरिजनांना मंदीरात प्रवेश मिळावा यासाठी 1932 पासूनच चळवळ सुरू झालेली होती विश्वप्रेमी मंडळ, हरिजन उध्दारक मंडळ, हरिजन सेवक संघ या संस्थाच्या वतीने मंदीर प्रवेश चळवळीला वेग आला,''[8] आणि हळूहळू संपूर्ण खानदेशात मंदीर प्रवेशाची चळवळ उभी राहिलेली दिसते.

'15 एप्रिल 1940 रोजी महामहोपाध्याय श्रीधरशास्त्रीच्या अध्यक्षतेखाली 'राममंदीराच्या पंचाना विनंती' या विषयावर श्री. विष्णुपंत निजसुरे यांचे व्याख्यान झाले.'[9] याठिकाणी शास्त्रीय दृष्टया हरिजनांना मंदीरात प्रवेश देण्यास काहीच हरकत नाही असे आवाहन केले गेले होते. मंदिर प्रवेशासंबंधी एक वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्याचे काम याकाळात बुध्दीवादयांनी केलेले होते. आपल्या वकृत्वातून आणि लेखनीतून प्रबोधनात्मक कार्य परिवर्तनवादी विचारसणीच्या मंडळीनी करायला सुरूवात केलेली होती. त्यातूनच खानदेशात मंदीर प्रवेश चळवळीला पाठबळ मिळत गेले.

खानदेशात मंदीर प्रवेशाच्या संदर्भात साने गुरूजींनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडलेली आहे. त्यांच्याच प्रयत्नातून 26 जानेवारी 1940 रोजी खिरोदे पूर्व खानदेश येथील विठ्ल मंदिर हरिजनांना खुले झाले. त्यापाठोपाठ भादली, भडगांव येथील मंदीरेही अस्पृश्यांना खुली झालीत. ' पातोंडे ता. चाळीसगांव येथील खाजगी राममंदिर व मारोती मंदिर श्री. शिवाजीराव भावे यांच्या हस्ते खुले करण्यात आले.'[10] अश्याप्रकारे अखिल खानदेशात अस्पृश्यांना मंदीर प्रवेश मिळाला पाहिजे यासाठी चळवळ छेडली गेलेली होती. साने गुरूजींनी अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रबोधन दौरा काढलेला. 'महाराष्ट्रातील सहा जिल्हयात 130 सभा घेवून मंदीर प्रवेशाबाबत त्यांनी प्रबोधन केलेले होते.' मंदीर प्रवेश चळवळीत साने गुरूजींनी भूमिका महत्वपूर्ण होती. 'धुळे येथील ॲड. भालचंद्र विठ्ल प्रधान यांनी डॉ. बाबासाहेब आंबेकडरांनी खानदेशातील अस्पृश्य बांधवांना मंदिरातील मूर्तीचे दर्शन घेण्यास, पूजा अर्चा करण्यास सनातनी मंडळीचा सनातनी मंडळीचा सनातनी मंडळीचा प्रखर विरोध होता.'[11] 17 एप्रिल 1927 रोजी पाटणे ता. चाळीसगांव येथे चंडीका देवीची यात्रा भरली असता, पोम्हा महार खिडकीतून देवीची मूर्ती पाहत असतांना तेथील पूजा–याने विटाळ झाला, असे संतापाने सांगून पोम्हा महारास धमकी देवून मारहाण केली. इतर लोकांनीही या अस्पृश्यास बेशुध्द होईपर्यंत मार दिला.'[12] असे प्रकार वारंवार खानदेशात होतांना दिसतात. खानदेशात परिवर्तनवादी विचारसणीचे शंकरराव ठकार, बाळूभाई मेहता यांनाही विशेष प्रयत्न केले. खानदेशातील पिंपळनेर येथील गणपतीचे मंदीर त्यांच्याच प्रयत्नाने अस्पृश्यासाठी खुले झाले. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी श्रीरंगा अय्र यांनी बील मांडले परंतू सनातनी मंडळीच्या प्रखर विरोधामुळे हे बील मागे घ्यावे लागले. श्रीरंगा अय्र यांनी मांडलेल्या बीलाविषयी जनजागृती करण्यासाठी खानदेशातही मोहीम राबविली गेली. 'मंदिर प्रवेश बिलाविरूध्द जळगांव येथे संकेश्वर करवीर पीठाचे स्वामी श्री. शंकराचार्य शिरोळकर महाराज यांच्या प्रेरणेने सहया घेण्याची मोहीम काढण्यात आली.'[13] 'जळगांवच्या बालाजी मंदिरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली.'[14] खानदेशात सर्वदूर सनातनी मंडळीनी या बिलाविरूध्द रान उठविले परंतू खानदेशातील साने गुरूजी, शंकरराव ठाकर, बाळूभाई मेहता, पं. श्रीधरशास्त्री पाठक, धनाजी नाना चौधरी यासारख्या सुधारणावादी मंडळीनी अस्पृश्याच्या मंदीर प्रवेशाचा जोरदार पुरस्कार केला. जनजागृती करून मंदिर प्रवेशाची चळवळ राबविली.

### *संदर्भ साधने सूची*


1.साप्ताहीक, प्रबोधचंद्रीका, 18 सप्टेंबर 1933, पृ.7.

2.पाठक (म.म.) श्रीधरशास्त्री, शिवस्मृती, अनुवादक, देशपांडे (डॉ.) च.र. (मराठी भाषांतर), प्रकाशक, वेदशास्त्र शिक्षण संस्था, धुळे (1978), पृ. 25.

3.पाठक (म.म.) श्रीधरशास्त्री, अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, प्रकाशक, पाठक (म.म.) श्रीधरशास्त्री 1933, पृ. 57,58.

4.पाटील (डॉ.) भी.ना. (प्राचार्य), खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ 1900 – 1950, प्रकाशक, भूषण भीमराव पाटील (2005), पृ. 208.

5.पाठक (म.म.) श्रीधरशास्त्री, अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, पूर्वोक्त, पृ. 192.

6.सुर्वे भा.ग. (संपा)., 'नवभारत', स्वामी केवलानंद विशेषांक (डिसें. 1978, जाने. 1979) पृ.13.

7.खंडकर अरूंधती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (2003), पृ. 25.

8. पाटील भी.ना. पूर्वोक्त, पृ. 209.

9. कित्ता, पृ. 347.

10.कित्ता, पृ. 349.

11.कित्ता, पृ. 350, 351.

12.मून, वसंत (संपा.),'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायक' मधील डॉ.आंबेडकरांचे लेख बहिष्कृत भारत, 6 मे 1927 पृ. 30.

13.साप्ता. प्रागतिक, 12 फेब्रु. 1934 पृ.2.

14. कित्ता, पृ.5.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net